आस्थापना - कोकण विभाग

उपजिल्हाधिकारी (अपील्स) यांचे १ पद, अकृषिक कामासाठीची ९१ पदे व अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण यांची ५९ पदे अशा आकृतीबंधाबाहेरील १५१ अस्थायी पदांना दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः ईएसटी-२०१७/प्र.क्र.३३/ई-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: २३ ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : संकिर्ण-१००२/प्र.क्र. ६६(भाग-२) /ई-८, दिनांक २०/०३/२००६.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. इएसटी-२६०६/प्र.क्र.२०६/ई-८, दि. १३ डिसेंबर, २०१०

३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क., दि. १० फेब्रुवारी, २०१७.

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : ईएसटी-२०१७/प्र.क्र. ३३/ई-८, दिनांक २१/०४/२०१७.

५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आपुक, दि.०३ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना :-

शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.१० फेब्रुवारी, २०१७ अन्वये आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या तसेच आकृतीबंधाबाहेरील सर्व अस्थायी पदांना दि.०१/०३/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले होते. त्यानुषंगाने कोकण विभागातील उपजिल्हाधिकारी (अपिल्स) यांचे १ पद व अकृषिक कामासाठीची ९१ पदे, अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण यांची ५९ पदे अशा

आकृतीबंधाबाहेरील एकूण १५१ अस्थायी पदांना संदर्भाधीन क्र. ४ येथील दि.२१/०४/२०१७ च्या शासन निर्णयानुसार दि.०१/०३/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

२. संदर्भ क्र. ५ येथील वित्त विभागाच्या क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आपुक, दि.०३ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन कोकण विभागातील (अपिल्स), अकृषिक कामासाठीची पदे व शेतजमीन न्यायाधिकरण यांच्या आकृतीबंधाबाहेरील एकूण १५१ अस्थायी पदांना वरील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कोकण विभागातील उपजिल्हाधिकारी (अपिल्स) यांचे १ पद व अकृषिक कामासाठीची ९१ पदे, अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण यांची ५९ पदे अशा आकृतीबंधाबाहेरील एकूण १५१ अस्थायी पदांना संदर्भाधीन क्र. ४ येथील दि. २१/०४/२०१७ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील आकृतीबंधाबाहेरील एकूण १५१ अस्थायी पदांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीसाठी वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.०३/१०/२०१७ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.-

२. सदर प्रस्तावातील पदांवर होणारा खर्च “मागणी क्र. सी-१, २०५३-जिल्हा प्रशासन, (०९३) जिल्हा आस्थापना, (०१) सर्वसाधारण आस्थापना, (०१)(०१), आयुक्त कोकण, (२०५३ ००२८) ०१, वेतन” या लेखाशिर्षाखालील सन २०१७-२०१८ साठी मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाने संदर्भाधीन क्र. ५ येथील दि.०३/१०/२०१७ च्या शासन निर्णयामध्ये दरम्यानच्या काळात सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय

विभागांनी दक्षता घेण्याबाबत निर्देशित केले आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी उचित कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आपुक, दि.०३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०२३११५१४८३०१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.10.23 15:09:51 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/पालघर.
३) प्रधान महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई.
४) अपर तहसिलदार, अंधेरी/कुर्ला-१/कुर्ला-३/बोरीवली-१/बोरीवली-२/ठाणे/कल्याण /भिवंडी/वसई/पालघर/जव्हार/रत्नागिरी (संबंधित जिल्हाधिका-यांमार्फत)
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
७) अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/ पालघर/ रायगड/रत्नागिरी, सिंधुदुर्ग.
९) कार्यासन अधिकारी, (आ.पु.क./व्यय-९), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
१०) कार्यासन अधिकारी, कार्यसन ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.